पं. दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्था संचलित,

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री

# विद्यार्थी परिषद

शै. वर्ष २०१८-१९

# वार्षिक अहवाल

प्राचार्य
डॉ. एस. आर. टकले

समिती प्रमुख
प्रा. डॉ. दत्तात्रय येडले

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री

## विद्यार्थी समिती

### शैक्षणिक वर्ष २०१८-१९

## वार्षिक अहवाल

विद्यार्थी परिषदेच्या वतीने आयोजित केलेले कार्यक्रम

अनुक्रमणिका



| अ.क्र. | नियोजित कार्यक्रम | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | गुणवंत विद्यार्थी सत्कार | ०२ |
| २. | विद्यार्थी प्रतिनिधि व सचिव निवड प्रक्रिया | ०२ |
| ३. | सावता भूषण निवड प्रक्रिया | ०३ |
| ४. | वार्षिक स्नेहसंमेलन | ०३, ०४ |
| ५. | वर्तमान पत्रातील दखल | ०५ |
| ६. | कार्यक्रमाचे छायाचित्रे | ०६ |



**विद्यार्थी परिषदेचे उद्दिष्ट्ये**

१. विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व गुण विकसित करण्यासाठी महाविद्यालयात विद्यार्थी संसदेची स्थापना करणे.

२. विद्यार्थ्यांमध्ये कार्यक्रमाचे नियोजन व आयोजन करण्याचे गुण विकसित करणे.

३. विविध कार्यक्रमाच्या आयोजनातून विद्यार्थ्याचे व्यक्तिमत्व विकसित करण्यास संधी देणे.

४. विद्यार्थ्यांमध्ये सुप्तगुणांना चालना देण्यासाठी विविध स्पर्धांचे आयोजन करणे.

५. विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी निर्माण करणे.

६. विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रभक्ती निर्माण करणे.

७. विद्यार्थ्यांमध्ये मुल्यसंवर्धन करणे.

८. विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढवण्यासाठी प्रोत्साहनपर विविध बक्षिस व पुरस्काराची योजना राबविणे.

९. विद्यार्थ्यांना भविष्यातील एक सुजाण नागरिक घडविणे.

विद्यार्थी परिषदेची कार्ये

१. विद्यार्थ्यांच्या विविध शैक्षणिक प्रश्नांची सोडवणूक करणे.
२. महाविद्यालयात विविध कार्यक्रमाचे आयोजन करणे.
३. वार्षिक स्नेहसंमेलन आयोजित करणे.
४. गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभाचे आयोजण करणे.
५. विद्यार्थ्यांना महाविद्यालयाच्या बाहेरील विविध स्पर्धामध्ये सहभागी होण्यासाठी प्रेरित करणे.

**गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभ**

प्रतिवर्षा प्रमाणे विद्यार्थी परिषद-समिती मार्फत शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील बी.ए. , बी.कॉम, बी.एस्सी व १२ वी मध्ये शिक्षण घेत असलेले परिसरातील प्रथम, द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार कार्यक्रमाचे आयोजन ४ ऑगस्ट २०१८ रोजी आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून मा. श्री. सलमान शेख (यु.पी.एस.सी परीक्षा उत्तीर्ण, फुलंब्री) हे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाराष्ट्र राज्य विधानसभा अध्यक्ष व संस्थेचे अध्यक्ष मा. ना. श्री. हरिभाऊ बागडे (नाना) यांनी भूषविले. कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती म्हणून संस्थेचे सचिव, मा. श्री. शामराव नाईक, संस्थेचे विश्वस्त डॉ. सर्जेराव ठोंबरे, फुलंब्रीचे नगराध्यक्ष मा. श्री. सुहासभाऊ शिरसाठ उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. एस. आर. टकले यांनी केले. या कार्यक्रमात एकूण ५१ विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ व पुस्तक देवून सत्कार करण्यात आला. यामध्ये १५ मुले व ३६ मुलींचा सहभाग होता. याप्रसंगी महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी, प्राध्यापक व कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी होते.

**विद्यार्थी प्रतिनिधी व सचिव निवड**

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये वार्षिक स्नेहसंमेलनानिमित्त महाविद्यालय स्तरावर विद्यार्थी समिती गठीत करण्यात आली. या महाविद्यालयातील वर्गप्रतिनिधी विविध विभागांच्या प्रतिनिधीमार्फत विद्यार्थी समिती प्रमुखाची निवड करण्यात आली.

खालीलप्रमाणे निवडलेल्या विद्यार्थी प्रतिनिधीमधून श्री. लक्ष्मीकांत कारभारी ढेपले यांची सचिव पदी बिनविरोध निवड करण्यात आली. यासंबंधीची बैठक दि. १८/०१/२०१९ वार शुक्रवार दुपारी २.०० वा. बैठक हॉल मध्ये संपन्न झाली. त्या बैठकीला खालील विद्यार्थी उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | बी.ए. प्रथम वर्ष | - | कु. पूजा प्रधान |
| २) | बी.ए. द्वितीय वर्ष | - | सोमीनाथ सहाने |

३) बी.ए. तृतीय वर्ष - कु. वर्षा तातेराव काळे
४) बी.कॉम प्रथम वर्ष - अक्षय मोरे
५) बी.कॉम. द्वितीय वर्ष - योगेश वाघ
६) बी.कॉम. तृतीय वर्ष - लक्ष्मीकांत ढेपले
७) बी.एसस्सी. प्रथम वर्ष - कु. योगिता मोरे
८) बी.एसस्सी. द्वितीय वर्ष - कु. अश्विनी बारवारे
९) राष्ट्रीय सेवा योजना व आजीवन शिक्षण विभाग - रोहीत शिंदे
१०) सांस्कृतिक विभाग - अमोल डकले
११) क्रीडा विभाग - राहुल सरोदे ~ B.A.
१२) महिला प्रतिनिधी - कु. ज्योती रमेश डदे
१३) महिला प्रतिनिधी - कु. मृणाली मनोरकर ~ B.Com

**सावता भुषण निवड प्रक्रिया**

महाविद्यालयाच्या वतीने बी.ए., बी.कॉम मधील तृतीय वर्षाच्या पुरस्कारासाठी लागू असलेल्या नियम व अटींच्या अधिन राहून हा पुरस्कार दिला जातो. यासंबंधी दि. १७/०१/२०१९ रोजी महाविद्यालयाच्या नोटीस बोर्डवर तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविण्याची संबंधीची सूचना लावण्यात आली. व विद्यार्थ्यांकडून दि. २१/०१/२०१९ रोजी दु. ३.०० वा. पर्यंत अर्ज जमा करण्याची मुदत देण्यात आली. दि. २१/०१/२०१९ पर्यंत एकूण तीन विद्यार्थ्यांचे अर्ज प्राप्त झाले. त्यासंबंधी दि. २३/०१/२०१९ रोजी दु. ३.०० वा. मा. प्राचार्यांच्या कक्षात सावता भुषण पुरस्कारासाठी आयोजित महाविद्यालय स्तरावरील समितीची बैठक बोलावून उपलब्ध अर्जावर समितीने मुल्यांकन व गुणांकन केले. त्यानुसार सर्वाधिक गुण बी.कॉम तृतीय वर्षाचा विद्यार्थी श्री. लक्ष्मीकांत कारभारी ढेपले याची शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करीता सावता भुषण पुरस्कार साठी निवड करण्यात आली.

**वार्षिक स्नेहसंमेलन**

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ चे वार्षिक स्नेहसंमेलन ३१ जानेवारी २०१९ ते ०२ फेब्रुवारी २०१९ दरम्यान आयोजित करण्यात आले. उद्घाटन समारंभ दि. ३१ जानेवारी २०१९ रोजी सायंकाळी ४.०० वा. मा. ना. हरिभाऊ बागडे (नाना), विधानसभा अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य, यांच्या हस्ते संपन्न झाला. कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. श्री. शामसुंदर नाईक (सचिव, पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्था, औरंगाबाद), प्रमुख उपस्थिती मा. श्री. अशोक दांडगे (गटविकास अधिकारी, फुलंब्री), मा. श्री. सुहासभाऊ शिरसाठ (नगराध्यक्ष, फुलंब्री), मा. श्री. नरेंद्र देशमुख (शालेय समिती अध्यक्ष) आदींची उपस्थिती होती. दि. ०१/०२/२०१९ रोजी

महाविद्यालयामध्ये काव्य वाचन, पोस्टर स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, प्रश्नमंजुषा , क्रीडा स्पर्धा अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. संध्याकाळी विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यामध्ये विविध धार्मिक, देशभक्तीपर गीतांचे सादरीकरण करण्यात आले. दि. ०२/०२/२०१९ रोजी स्नेहसंमेलनाचा समारोप समारंभ आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती म्हणून प्राध्यापक विष्णु सुरासे (प्रसिद्ध हास्य कवी, औरंगाबाद) व मा. श्री. रविंद्र काथार (सदस्य महाविद्यालय विकास समिती) यांची होती. तर अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. टकले हे होते. याप्रसंगी वार्षिक स्नेहसंमेलनानिमित्त घेण्यात आलेल्या विविध स्पर्धा व वर्ष भरातील घेण्यात आलेल्या स्पर्धांमधील विजेत्या प्रथम, द्वितीय क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर प्रमाणपत्र व पुस्तक भेट देण्यात आले.

तसेच शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील देण्यात येणा-या सावता भूषण पुरस्काराचे वितरण या समारंभ प्रसंगी करण्यात आले. या पुरस्काराच्या मानपत्राचे वाचन प्रा. डॉ. दत्तात्रय येडले यांनी केले. महाविद्यालयाच्या सावता भूषण पुरस्कार बी. कॉम तृतीय वर्षाचा विद्यार्थी श्री. लक्ष्मीकांत कारभारी ढेपले याला मान्यवरांच्या उपस्थितीत देण्यात आला. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे विद्यार्थी, प्राध्यापक व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पंडित दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्था संचलित,

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री

ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद.

अभिनंदन! अभिनंदन!! अभिनंदन!!

# गुणवंतांचा सत्कार

श्री./श्रीमती ------------------------------------

स.न.वि.वि. आपणास कळविण्यात आनंद होतो की, महाविद्यालयातील शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील बी. ए., बी. कॉम., बी.एस्सी., १२ वी(कला व विज्ञान) या विद्या शाखेतून तसेच परिसरातील बारावी परीक्षेत प्रथम आलेले गुणवंत व स्पर्धा परीक्षेत यश प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्याचे आम्ही आयोजन केले आहे. तरी त्यांचा आनंद द्विगुणीत करण्यासाठी आपण उपस्थित रहावे.

**कार्यक्रमाचे अध्यक्ष :** मा. श्री. हरिभाऊ बागडे (नाना)
(अध्यक्ष, विधानसभा महाराष्ट्र राज्य व
पंडित दिनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्था, औरंगाबाद)

**प्रमुख उपस्थिती :** मा. श्री. शामसुंदर नाईक
(सचिव, पं. दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्था औरंगाबाद)

मा. डॉ. सर्जेराव ठोंबरे
(विश्वस्त, पं. दिनदयाळ उपाध्याय शि. संस्था, औरंगाबाद)

मा. श्री. सुहासभाऊ शिरसाठ
(नगराध्यक्ष, फुलंब्री शहर)

**प्रमुख मार्गदर्शक :** मा. श्री. सलमान शेख (U.P.S.C.परीक्षा उत्तीर्ण)

*** दिनांक व वेळ ***
४ ऑगस्ट २०१८ रोजी
सकाळी : ११.०० वा.

*** स्थळ ***
महाविद्यालयाचे सभागृह

## * विनीत *

डॉ. दत्तात्रय येडले
डॉ. रामकिसन लोमटे
(समिती प्रमुख)

श्री. ज्ञानेश्वर थोरे
(मुख्याध्यापक)

डॉ. एस. आर. टकले
(प्राचार्य)

महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी

## विभिन्न उपक्रमों के उपलब्ध छायाचित्र







गुणवंतांचा सत्कार
08.2018


04.08.2018


04.08.2018

## ❋ विभिन्न उपक्रमों के उपलब्ध छायाचित्र ❋






# निमंत्रण पत्रिका

पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्था संचलित.

## श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय,फुलंब्री
ता.फुलंब्री जि.औरंगाबाद

# वार्षिक स्नेहसंमेलन २०१८-१९

श्रीमान / श्रीमती ........................................ स.न.वि.वि.

आपणांस कळविण्यात आनंद होतो की, आमच्या महाविद्यालयाचे स्नेहसंमेलन दि.३१ जानेवरी ते २ फेब्रुवारी २०१९ ,या दरम्यान संपन्न होत आहे.तरी या स्नेहसंमेलन सोहळ्यास आपण उपस्थित राहून आमचा आनंद व्दिगुणीत करावा.

## उद्घाटन समारंभ

उद्घाटक मा.हरिभाऊ बागडे (नाना)
(विधानसभा अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य )

अध्यक्ष मा.श्री.शामसुंदर नाईक
(सचिव, पं.दी.उ.शि.सं.औरंगाबाद)

प्रमुख उपस्थिती मा.श्री.अशोक दांडगे
(गटविकास अधिकारी,पं.स.फुलंब्री )

मा.श्री.[illegible] शिरसाट
(नगराध्यक्ष, [illegible],फुलंब्री )

मा.श्री.नरेंद्र देशमुख
(शालेय समिती अध्यक्ष, श्री संत सावता गुरुकुल)

## समारोप समारंभ

शनिवार दि.०२-०२-२०१९ वेळ : दु.१:०० वा.

अध्यक्ष
प्राचार्य डॉ.सुभाष टकले
श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय,फुलंब्री.

प्रमुख उपस्थिती

प्रा.विष्णु सुरासे
(प्रसिध्द हास्य कवी)

श्री.रविंद्र काथार
(फुलंब्री)

**विनीत**

प्राचार्य,प्रभारी प्राध्यापक,विद्यार्थी समिती प्रमुख व सदस्य,
प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी
श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री


श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय,फुलंब्री.
ता.फुलंब्री जि.औरंगाबाद


सावता
भूषण
पुरस्कार
शैक्षणिक वर्ष
2018-19
श्री लक्ष्मीकांत कारभारी ढेपले


02.02.2019


डॉ.बाबासाहेब आंबेडकर अभ्यासिका
श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री.
वार्षिक स्नेहसंमेलन
२०१८-१९
02.02.2

# बौद्धिक क्षमता वाढविण्यासाठी कष्ट घ्यावेत

दै. पुढारी - 06-08-2016

## भाऊ बागडे : फुलंब्रीच्या संत सावता माळी महाविद्यालयात गुणवंतांचा सत्कार



फुलंब्री : सलमान पटेल यांचा सत्कार करताना विधानसभा अध्यक्ष हरिभाऊ बागडे. सोबत उपस्थित श्यामसुंदर नाईक, डॉ. सर्जेराव ठोंबरे.

ी : प्रतिनिधी

बौद्धिक क्षमता वाढविण्यासाठी र्थ्यांना श्रम व कष्ट केल्याशिवाय नाही. वर्तमान युग हे स्पर्धेचे आहे. याकडे बौद्धिक क्षमता आहे, आज पुढे जाणार आहे. बौद्धिक वाढविण्यासाठी विद्यार्थ्यांनी मेहनत घ्यावी. त्या आधारेच यश त करता येईल. श्रमाला प्रतिष्ठा हणजे यश तुमचेच असेल, असा विधानसभा अध्यक्ष हरिभाऊ यांनी दिला.

येथील संत सावता माळी ग्रामीण द्यालयातील विद्यार्थी संसदेच्या तालुक्यातील इयत्ता १२ वी प्रथम व द्वितीय क्रमांकाने यश न केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा यांच्या हस्ते शनिवार (दि. ०४) र करण्यात आला. यावेळी क्षपदावरून ते बोलत होते. क्रमात संस्थेचे विश्वस्त डॉ. सर्जे ठोंबरे, सचिव शामसुंदर नाईक, ध्यक्ष सुहास शिरसाट, यूपीएससी र्ण सलमान पटेल यांची प्रमुख थत होती. प्राचार्य, डॉ. एल. आर. ढवले यांनी मान्यवरांचे स्वागत केले. यावेळी भाषा मंडळाच्या वतीने पुष्पांथर या वार्षिक अंकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

या प्रसंगी फुलंब्री तालुक्यातील विविध महाविद्यालयातील ५५ गुणवंत विद्यार्थ्यांचा व महाविद्यालयातील डॉ. पांडुरंग कल्याणकर, डॉ. सुरेश मुंढे, डॉ. संदीप जगताप, डॉ. संजीवकुमार पांचाळ यांचा सत्कार बागडे व प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. महाविद्यालयातील समाजशास्त्र विभागाच्या वतीने दिला जाणारा घुपाजी खोतकर हा पुरस्कार प्रियंका गायकवाड या विद्यार्थिनीला देण्यात आला. याप्रसंगी नरेंद्र देशमुख, पोलिस निरीक्षक सम्राटसिंह राजपूत, हौसाबाई काटकर, काथार यासह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व कर्मचारी विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. महेश थोरात व डॉ. अश्विन रांजणीकर यांनी केले. तर आभार विद्यार्थी संसद प्रमुख, डॉ. दत्तात्रय येडले यांनी मानले.

---

ार्थी संसद उद्घाटन । विधानसभा अध्यक्ष हरिभाऊ बागडे यांचे फुलंब्री येथे प्रतिपादन

# याच्याकडे जास्त बौद्धिक क्षमता ोच आज स्पर्धेमध्ये सर्वात पुढे

प्रतिनिधी । फुलंब्री



फुलंब्री येथे गुणवंतांचे स्वागत करताना विधानसभा अध्यक्ष बागडे.

### चिकाटीनेच यशस्वी

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयात हिंदी सप्ताह व वाङ्मय मंडळाचे उद्घाटन

लोकमत टाइम्स 17-09-2018

फुलंब्री (प्रतिनिधी):- शहरातील श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयात हिंदी सप्ताह व वाङ्मय मंडळाचे उद्घाटन प्रोफेसर, भारती गोरे (हिंदी विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद) यांच्या हस्ते १४ सप्टेंबर रोजी करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. एस.आर.टकले उपस्थित होते. याप्रसंगी प्रास्ताविक, हिंदी विभाग प्रमुख, डॉ.दत्तात्रय येडले, यांनी केले. डॉ. अश्विन रांजणीकर, वाङ्मय मंडळ विभाग प्रमुख, डॉ. सुरेश मुंढे, डॉ. राजश्री पवार, डॉ. संजीवकुमार पांचाळ आदी, वाङ्मय मंडळ सदस्यांची उपस्थिती होती. बोलत असताना प्रोफेसर गोरे म्हणाल्या की, हिंदी भाषा आत्मीयता निर्माण करणारी भाषा आहे. कोणत्याही भाषेचा मुख्य उद्देश संप्रेषण करणे असतो. परंतु जेव्हा एखादी भाषा शुद्ध बोलण्याचा आपण प्रयत्न करतो, त्यावेळी त्या भाषेला धोका होण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणून भाषेचा शुद्धतावादी दृष्टीकोन न ठेवता साधी, सरळ सोपी भाषा बोलण्याचा प्रयत्न करावा. म्हणजे ती भाषा आपली वाटेल. हिंदी भाषेच्या अनेक संधी उपलब्ध आहेत. ती फक्त बोलण्यापुरती मर्यादित ठेवू नका. असा सल्ला दिला. अध्यक्षीय समारोप प्राचार्य, डॉ. एस.आर.टकले यांनी केला. तर उपस्थित मान्यवरांचे आभार कु.ऋतुजा जाधव या विद्यार्थिनीने मानले. पाहुण्यांचा परिचय, कु. पूजा बहादुरे तर सूत्रसंचलन कु. आरती बोरसे या विद्यार्थिनीने केले.

देशोन्नती सोमवार, दि. ६ ऑगस्ट २०१८

# उत्तुंग यशासाठी बौद्धिक क्षमता व श्रम प्रतिष्ठा महत्त्वाची - ना.हरिभाऊ बागडे

तालुका प्रतिनिधी / ५ ऑगस्ट

फुलंब्री : विद्यार्थ्यांमध्ये असणारी बौद्धिक क्षमता याची तीव्र व श्रम प्रतिष्ठा केल्याशिवाय प्राप्त होणार नाही. आताचे युग हे स्पर्धेचे व विविध संधीचे आहे. त्याचाकडे असलेली बौद्धिक क्षमता तोच आज पुढे आहे. म्हणून ती क्षमता वाढविण्यासाठी विद्यार्थ्यांनी कष्टांनी प्रयत्न करावेत असे प्रतिपादन विधानसभा अध्यक्ष हरिभाऊ बागडे यांनी केले. शहरातील श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयातील विद्यार्थी संसदेच्यावतीने शनिवार दि. ४ ऑगस्ट रोजी, फुलंब्री तालुक्यातील इयत्ता १२ वी मध्ये प्रथम व द्वितीय यश संपादन केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राज्य विधानसभा अध्यक्ष हरिभाऊ बागडे उपस्थित होते. यावेळी पंडित दिनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्थेचे विश्वस्त डॉ. सर्जेराव ठोंबरे, पंडित दीनदयाळ शिक्षण संस्थेचे सचिव शामसुंदर नाईक, फुलंब्री नगरपंचायतचे नगराध्यक्ष सुहास शिरसाठ यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरुवातीस कार्यक्रमाची भूमिका महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस. आर. टकले यांनी मांडली. तसेच संस्थेचे सचिव शामसुंदर नाईक यांनी स्थानिक विकासासाठी महाविद्यालयाची भूमिका महत्त्वाची असते, त्या अनुषंगाने त्या त्या महाविद्यालयांनी ती भूमिका पार पाडली अशी भूमिका मांडली.

नगराध्यक्ष सुहास शिरसाठ बोलताना म्हणाले की, फुलंब्री या गावाने शिक्षण आणि खेळ या क्षेत्रात चांगले व गुणवान विद्यार्थी दिले आहेत, ज्यांच्यामुळे फुलंब्री नाव संपूर्ण देशात गाजताना दिसते आहे. म्हणून अशा विद्यार्थ्यांची प्रेरणा येथील विद्यार्थ्यांनी घ्यावी. असे मत व्यक्त केली. यावेळी वाङ्मय मंडळाच्यावतीने पुष्पांजली या वार्षिक अंकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी ५५ व्या तालुक्यातील विविध महाविद्यालयातील ५५ गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार मान्यवरांच्या व इतर मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

# यशासाठी बौद्धिक क्षमता, श्रम महत्त्वाचे

ई-सकाळ 10-08-2018

सलमान शेख : सावता माळी महाविद्यालयात गुणवंतांचा सत्कार

फुलंब्री, ता.९ (बातमीदार) : यशासाठी बौद्धिक क्षमता व श्रम महत्त्वाचे असल्याचे प्रतिपादन दुबईस्थित उद्योजक शेख सलमान यांनी केले. येथील संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयात विद्यार्थी संसदेच्या वतीने तालुक्यातील बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा शनिवारी (ता. चार) सत्कार करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते.

श्री. शेख म्हणाले, की ज्या विद्यार्थ्यांचे ध्येय उच्च असेल ते कधीच न डगमगता ध्येयापर्यंत पोचतात. विद्यार्थ्यांनी स्वप्न मोठी पाहिली पाहिजेत. ते साध्य करण्यासाठी कष्ट करण्याची तयारी असली पाहिजे. [illegible] आपले ध्येय निश्चित करून पुढे जाण्याची एकाग्रता असली पाहिजे. यश तुमचेच आहे. या पदाची परिपूर्ती करायची असेल तर आपल्या स्वप्नांनी आपली झोप उडविली पाहिजे. महत्त्वाकांक्षा आपल्याला स्वप्न दिसत राहील. स्वप्नाला विकासाचे रूप देण्यासाठी पर्याय नाही आणि मेहनत विद्यार्थ्यांनी करावी.

यावेळी तालुक्यातील विविध महाविद्यालयातील ५५ गुणवंत विद्यार्थ्यांना सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी राज्य विधानसभा अध्यक्ष हरिभाऊ बागडे, सचिव श्यामसुंदर नाईक, डॉ. सर्जेराव ठोंबरे, नगराध्यक्ष सुहास शिरसाठ, नरेंद्र देशमुख, पोलिस निरीक्षक [illegible] राजपूत, [illegible] यांच्यासह प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते. [illegible] व डॉ. अश्विन रांजणीकर यांनी सूत्रसंचालन केले. विभाग प्रमुख डॉ. दत्तात्रय येडले यांनी आभार मानले.



फुलंब्री : येथील सावता माळी महाविद्यालयात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सलमान शेख.